Exh.No. 16

# नेवासा येथील मे.सिव्हिल जज्ज साहेब, सि.डी.

रे.मू.नं. यांचे कोर्टात

४६२/२०२३

<u>वादी</u>

राजश्री निखिल ताकटे

<u>प्रतिवादी</u>

शोभा केरु आठरे, वगैरे

<u>याकामी वादीचे सरतपासणीचे ॲफिडेव्हिट असे ते खालीलप्रमाणे :-</u>

<u>याकामी मी राजश्री निखिल ताकटे, वय-४०, धंदा-शेती, रा.प्रेमदान चौक, सावेडी, ता.जि.अहमदनगर सत्यप्रतिज्ञेवर सरतपासणीचे ॲफिडेव्हिट करते की, -</u>

Order
Put up for
Verification.

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2025.11.14 17:47:28 +0530

Jt.CJJD

१) सदरचा दावा मी प्र.वादींविरुध्द हिंदु वारसा कायदा कलम ६ प्रमाणे दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटपासाठी, तसेच स्पेसिफीक रिलीफ ॲक्टचे कलम ३४ प्रमाणे जाहीर ठरावासाठी व कलम ३६ प्रमाणे निरंतर ताकीद मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. सदरचे दाव्यातील दावा मिळकत ही मौजे उस्थळदुमाला, ता.नेवासा येथील गट नं.३२५ क्षेत्र १ हे. २० आर, गट नं.३२६ क्षेत्र ०हे. ७६ आर, तसेच गट नं.३२७ पैकी क्षेत्र ० हे. ४५ आर तसेच मौजे सौंदाळा, ता.नेवासा येथील गट नंबर ९८ पैकी क्षेत्र ४ हे. ३२ आर, गट नं.११० पैकी क्षेत्र ० हे. १७ आर, गट नं.१०८/२ पैकी,क्षेत्र २ हे. ०० आर, तसेच गट नं.१०५/१ पैकी क्षेत्र १ हे. २१ आर अशी आहे.

२) सदर दाव्यातील प्र.वादी नं.१ माझी आई असुन प्र.वादी नं.२ हा माझा भाऊ आहे. तर प्र.वादी नं.३ ही माझी बहिण असुन प्र.वादी नं.४ ही माझी भावजई आहे. तसेच प्र.वादी नं.५ हा माझा पुतण्या म्हणजे प्र.वादी नं.२ चा मुलगा आहे. अश्याप्रकारे माझे व प्र.वादी नं.१ ते ३ यांचे एकत्र हिंदु कुटुंब होते व आजही आहे.

Assistant Superintendent
Criminal Court Newasa

३) दावा मिळकती हया माझ्या व प्रतिवादी यांचे एकत्र हिंदु कुटुंबाच्या वडिलोपार्जित व एकत्र हिंदु कुटुंबाच्या उत्पन्नातुन एकत्र कुटुंबासाठी माझे व प्र.वादी नं.२, ३ यांचे वडील मयत केरु आठरे यांनी खरेदी केलेल्या मिळकती होत्या व आहेत. मयत केरु आठरे हे हयात असतांना दावा मिळकती हया त्यांच्या नावावर होत्या परंतु त्यांचे मृत्युनंतर माझे व प्र.वादी नं.१ ते ३ यांचे नावे वारस म्हणुन सामाईकात दावा मिळकतीस फेरफार नं.३६८७ ने लागलेली आहेत. तेव्हापासुन मी व प्र.वादी नं.१ ते ३ हे एकत्रातच दावा मिळकतीची मेहनत, मशागत करुन उत्पन्न, उपभोग घेत होते व आहेत. मयत केरु आठरे यांचे मृत्युनंतर माझे व प्र.वादी नं.१ ते ३ यांच्यामध्ये आजपर्यंत हिंदु कायदयाप्रमाणे सरस निरस मानाने दावा मिळकतीचे वाटप झालेले नव्हते व नाही. दावा मिळकतीमध्ये माझा अविभक्त हिस्सा होता व आहे मी व प्र.वादी हे एकत्रातच दावा मिळकतीची मेहनत, मशागत करून उत्पन्न, उपभोग घेत होते व आहेत. परंतु मयत केरू आठरे व प्र.वादी नं.१ यांनी माझे अपरोक्ष मला अंधारात ठेवून मला कोणतीही माहीती न देता दावा मिळकत गट नं.१०५/१, ११० व ९८ ला मिळकतीचे प्र.वादी नं.४ व ५ यांना महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम कलम ८५ प्रमाणे तहसीलदार नेवासा यांचेमार्फत बेकायदेशीररित्या वाटप करुन दिल्याचे व त्याप्रमाणे फेरफार नं.३५५४ ने गावी नोंद झाल्याचे दिसते. परंतु त्या वाटपाला मी पक्षकार नसल्याने व सदरचे वाटप हे केरु आठरे व प्र.वादी नं.१ यांनी माझे अपरोक्ष करून दिलेले आहे ते वाटप माझ्यावर बंधनकारक नव्हते व नाही.

४) अलीकडे दावा मिळकतीचे उत्पन्नावरुन व कब्जेवहिवाटीवरुन माझे व प्रतिवादीमध्ये मतभेद होवुन वाद झाले आहेत ते वाद आपसात न मिटता अत्यंत विकोपाला गेले आहेत. प्र.वादी हे मला दावा मिळकतीतील काहीएक उत्पन्न व

Superintendent
Court Newasa

हिशोब देईनासे झाले आहेत. अश्या परिस्थितीत मला माझा दावा मिळकतीत असलेला अविभक्त हिस्सा सामाईकात ठेवणे योग्य वाटले नाही म्हणुन मी ता.३०/०३/२०२३ रोजी माझा दावा मिळकतीत असलेला अविभक्त हिस्सा प्र.वादींना सरस निरस मानाने वाटप करुन, पृथक प्रत्यक्ष कब्जात मागितला असता प्र.वादींनी मला वाटप करून देण्याचे नाकारले. तेव्हा मी प्र.वादींना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु उपयोग झाला नाही, म्हणुन नाविलाजास्तव मला सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द दाखल करणे भाग पडले आहे.

५) सदरचे दाव्यात काही प्र.वादी यांचेविरुध्द विनाकैफियतीचा आदेश पारीत केलेला आहे. तसेच काही प्रतिवादींचे विरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश झालेला आहे.

६) तसेच सदरचे दाव्यासोबत मी जी काही कागदपत्रे दाखल केलेली आहेत त्यातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर असून त्यांना निशाणी नंबर देण्यात येवून पुराव्याकामी वाचण्यात यावीत.

७) <u>माझी विंनती की,</u>

माझा दावा मिळकतीमध्ये असलेला अविभक्त हिस्सा अगर मे.कोर्ट ठरवील तो हिस्सा मला सरस निरस मानाने वाटप करुन, पृथक करुन प्रत्यक्ष कब्जात देववावा. प्र.वादी नं.१ व मयत केरु आठरे यांनी माझे अपरोक्ष व मला अंधारात ठेवून प्र.वादी नं.४ व ५ यांना फेरफार नं.३५५४ ने म.ज.म.अ कलम ८५ अन्वये करुन दिलेले वाटप हे मुलत: बेकायदेशीर असून ते माझ्यावर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव होवून मिळावा. प्र.वादी यांनी दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे आणि कोणत्याही स्वरुपात हस्तांतरण करु नये अगर दावा मिळकतीवर कोणत्याही वित्तिय संस्थेचे कर्जाचे बोजे निर्माण करु

नये अशी निरंतर ताकीद देववावी. दावा मिळकतीतील माझे हिस्याचे दरम्यानचे उत्पन्नाबाबत योग्य तो हुकुम व्हावा. सिव्हिल प्रोसिजर कोड कलम ५४ प्रमाणे वाटपाचा हुकुमनामा मे.जिल्हाधिकारी साहेब, अहमदनगर यांचेकडे पाठविण्यात यावा ही विनंती. इतर योग्य ते न्यायाचे हुकुम माझे लाभात व्हावेत.

येणेप्रमाणे ॲफिडेव्हिट केले असे.

नेवासा

दिनांक :-१४/११/२०२५

ॲफिडेव्हिट करणार

ओळख

(ॲड.जी.यु.भताने)

याकामी मी राजश्री निखिल ताकटे, वय-४०, धंदा-शेती, रा.प्रेमदान चौक, सावेडी, ता.जि.अहमदनगर सत्यप्रतिज्ञेवर खरे सांगते की, वर नमुद केलेला संपूर्ण मजकूर हा माझ्या माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी मी आज रोजी माझी सही या लेखाखाली केली असे.

नेवासा

दिनांक :-१४/११/२०२५

ॲफिडेव्हिट करणार

Mobil. ID .0010.

Solemnly affirmed before me by Rajashree Nikhil who is identified before me by Adv. G.U. Bhatane whom I personally know

Takate Age 40 occ Agri R/o. Savedi A Nagar

Asstt. Superintendent